
तरुण भारत



कोल्हापूर : ज्या चंद्राच्या साक्षीने रात्री गनिमी काव्याने शत्रूला नमवले. त्याच चंद्राने हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यावर बुद्धपौर्णिमेच्या चंद्र प्रकाशाच्या शीतल किरणांनी जणू दुग्धाभिषेकच केला.

(छाया : रियाज ट्रेनर)

जनसंपर्क कक्ष
29 MAY 2021
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विश्वकोश निर्मिती मंडळावर डॉ. अरुण भोसले, डॉ. प्रकाश पवार यांची नियुक्ती

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची नुकतीच पुनर्रचना करण्यात आली. शिवाजी विद्यापीठातील माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले व राज्यशास्त्राचे प्रा. डॉ. प्रकाश पवार यांची राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती केली. तसेच राज्य



डॉ. अरुण भोसले



डॉ. प्रकाश पवार

साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य म्हणून शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांची नियुक्ती केली. डॉ. भोसले, डॉ. पवार, डॉ. शिंदे यांच्या नियुक्तीचा कार्यकाल हा ३ वर्षांचा असणार आहे. डॉ. भोसले यांनी यापूर्वीच्या विश्वकोश मंडळातही सदस्य म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन शासनाच्या मराठी भाषा विभागाने त्यांना नव्याने नियुक्त केलेल्या मंडळात पुन्हा स्थान दिले आहे. तसेच डॉ. प्रकाश पवार हे सध्या विश्वकोशाच्या राज्यशास्त्र ज्ञानमंडळावर समन्वयक म्हणून आणि डॉ. शिंदे हे सुद्धा विश्वकोशाच्या मराठी साहित्य ज्ञान मंडळावर समन्वयक म्हणून कार्यरत आहेत.

29 MAY 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाने घातली जलसमृद्धीत भर

**शिवाजी विद्यापीठाच्या ३४५.६० हेक्टर परिसराला पाण्याची कमतरता भासू नये म्हणून पाण्याचे संकलन, पुनर्भरण करून नव्याने दोन तलाव व विहिरींची निर्मिती करून आज विद्यापीठ पाण्याबाबत स्वयंपूर्ण झाले, ही कोल्हापूरच्या जलसमृद्धीत झालेली भर आहे.**

**- उदय गायकवाड**








शिवाजी विद्यापीठातील जलवैभव.

ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह विद्यापीठात आले असताना त्यांच्या समवेत तत्कालीन कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव सालोखे, उदय कुलकर्णी, उदय गायकवाड यांनी परिसराची पाहणी करताना जलसंचय कसा करता येईल, याचे मार्गदर्शन केले. कुलगुरूंनी २००१-०२ मध्ये भाषाभवन मागे तलाव बांधायला सुरुवात केली. २००५ ला पूर्ण होऊन ८.५३ द.ल. घनफूट पाणी साठू लागले, यासाठी ७० लाख खर्च झाला. रेनवॉटर हार्वेस्टरसाठी महत्त्वाची पावले उचलली गेली.

सर्व इमारतींच्या छतावरील पाणी एका टाकीत साठवून ते वापरले. २४.५९ लाख रुपये खर्च करून संगीत विभागाच्या मागील बाजूस तलाव निर्मिती करून २.८३ द.ल.घनफूट साठू लागले. मुलांची पाच व मुलींची चार वसतिगृह असून, एकूण ३५०० विद्यार्थी, १४० स्टाफ कॉर्टर्स, ३९ विविध विषयांचे विभाग, विज्ञान शाखेच्या प्रयोगशाळा, ३७ हेक्टर उद्यान यासाठी रोज पिण्यायोग्य ५ लाख लिटर व वापराचे ६ लाख लिटर पाण्याची आवश्यकता असते. महिन्याला ७ लाख रुपये खर्च वाचवण्यासाठी रेनवॉटर हार्वेस्टिंग हाच पर्याय पुढे आला.

२०१३ मध्ये क्रीडा विभागाजवळ १०० फूट व्यास ८० फूट खोल विहीर व २०१४ बोट्यानिकल गार्डनसाठी आणखी एक विहीर तयार करण्यात आली. ग्रंथालयजवळ एक फिल्टर हाऊस बांधून विहिरीतील पाणी वर्षभर पिण्यासाठी शुद्ध केले जाते. २०१६ मध्ये उन्हाळ्यात पाणी पुरणार नसलेले १५ एप्रिलपूर्वी परीक्षा घ्याव्या लागल्या होत्या. पाणी पुरत नाही यावर उपाय म्हणून जून २०१६मध्ये शेततळी तयार करणे, विहिरीतील गाळ काढणे, त्यांचे पूर्णजिवन करणे, जुन्या चरी दुरुस्ती व नवीन चरी खोदणे असा निर्णय झाला.

१४ एप्रिल २०१६ ते ५ जुलै २०१६ एनएसएस विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून शेततळी व सुतार विहीरीमध्ये उतारणे पाणी गोळा करणे, तिन्ही तळी जोडन्याचे काम झाले. त्यांची क्षमता ४० लाख लिटर असून, खर्च एक लाख २५ हजार झाला. परिसरात सहा विहिरी जुन्या असून, सुतार विहीर पिण्यासाठी व बोट्यानिकल गार्डनसाठी एक विहीर अशा नवीन दोन विहिरी तयार करण्यात आल्या. चार वापरत नसलेल्या विहिरींपैकी आणखी दोन विहिरी वापरत आणायचे ठरवले. सिंथेटिक ट्रॅक येथे ६० फूट व शिंदे विहीर येथे ३० फूट गाळ काढण्यात आल्यामुळे तेथील झरे पुन्हा सुरू झाले. यासाठी खर्च ६ लाख झाला असून, उर्वरित काम प्रस्तावित आहे. सर्व कॅम्पसमध्ये अडीच किलोमीटर लांबीच्या चरी खोदून पाणी वळवण्यासाठी ५० हजार खर्च झाले. पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी मुलींचे वसतिगृहमधील साठ हजार लिटर प्रतिदिन व तंत्रज्ञान विभागाकडील मुलांचे वसतृिहातील पन्नास हजार लिटर प्रतिदिन प्रक्रिया करून ते उद्यानासाठी वापरले जाते.

जुलै २०१६ मध्ये दोन दिवसात पावसाचे २८ कोटी लिटर पाणी साठले तेव्हापासून महापालिकेचे पाणी घेणे बंद केले गेले. सद्या २८ कोटी लिटर साठवणुकीतील १० लाख लिटर रोज वापर होतो. महापालिका बिलाचे ६ लाख रुपये वाचतात. 'गाव करेल ते राव काय करेल' अशी उक्ती इथे 'विद्यापीठ करील ते गाव गिरविल' अशी खरी झाली, तर जलसमद्धी कायम राहील.

### विद्यापीठात पाणी किती ?

- भाषा भवन..... २२.१५ कोटी लिटर
- संगीत विभाग जवळ .... ५.२० लिटर
- सुतार विहिर.......... ४ लाख लिटर
- क्रीडा विभाग.... ४.८७ लाख लिटर
- केमेस्ट्री विभाग....... ३ लाख लिटर
- सिंथेटीक ट्रेक ........ ५ लाख लिटर
- शिंदे विहीर............ ३लाख लिटर
- ३ शेततळी ..........४० लाख लिटर

पुढारी

# डॉ. गायकवाड, मोहोळकर यांना जागतिक शास्त्रज्ञांमध्ये स्थान





**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

एडी सायंटिफिक इंडेक्स संस्थेने घेतलेल्या सर्वेक्षणात शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. डॉ दत्तात्रय गायकवाड, पदार्थ विज्ञान विभागाचे प्रा. डॉ. अण्णासाहेब मोहोळकर, डॉ. एन. एल. तरवाळ यांना जगातील नामांकित शास्त्रज्ञांमध्ये स्थान मिळाले आहे.

एडी सायंटिफिक इंडेक्सने नुकतेच जागतिक स्तरावरील १६७ देशांमधील दहा हजारांच्यावर संशोधन संस्था व विद्यापीठातील साधारण ५ लाख शास्त्रज्ञांची यादी गुगल स्कॉलरचा आधार घेऊन प्रसिद्ध केली. यादी तयार करण्यासाठी गेल्या पाच वर्षांतील शास्त्रज्ञांचे संशोधन पेपर, एच इंडेक्स, सायटेशन हे निकष वापरण्यात आले. प्रा. गायकवाड यांनी बायलॉजीकल सायन्स क्षेत्रात काम करणाऱ्या शास्त्रज्ञामध्ये स्थान मिळविले आहे. त्यांचे संशोधन मुख्यत: प्लांट फिजिओलॉजी क्षेत्रात सुरू आहे. त्यांनी दोन पेटेंट रजिस्टर केली आहेत. डॉ. मोहोळकर यांनी पदार्थविज्ञानमध्ये दक्षिण कोरियातून पोस्ट डॉक्टरेट केली आहे. सौर ऊर्जा, गॅस सेन्सिग, सुपरकॅपॅसिटर आदींचे पेटंट मिळविले आहेत. दुंडगे (ता. चंदगड) येथील डॉ. एन. एल. तरवाळ हे विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक आहेत. मटेरियल सायन्समधील सोलर सेल, इलेक्ट्रोक्रोमिझम आदी क्षेत्रात संशोधन करीत आहेत. याशिवाय न्यू कॉलेजमधील रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. अशोक चौगले, मडिलगे (ता. भुदरगड) येथील डॉ. विनायक पारळे यांनी शास्त्रज्ञांच्या यादीत स्थान मिळविले आहे.